| | |
|---|---|
| MHGA030003252021 | दाखल तारीख : ०३.०६.२०२१<br>नोंदणी तारीख : ०३.०६.२०२१<br>निकालतारीख : २४.०३.२०२६<br>कालावधी : ०४वर्ष, ०९ म., २१ दि.<br><br>**निशाणी क्रमांक : १२ पुढे** |

| | |
|---|---|
| | **न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी, गडचिरोली यांचे न्यायालय**<br>**समक्ष : श्रीमती वासंती. र. मालोदे**<br>**न्यायनिर्णय पारीत दिनांक : २४/०३/२०२६**<br>**संक्षिप्त फौजदारी मामला क्रं.१६१/२०२१** |
| | **गुन्हा क्र.१९/२०२१** |
| फिर्यादी/तक्रारकर्ता | महाराष्ट्र शासन तर्फे<br>पोलीस ठाणे, गडचिरोली,<br>ता.जि. गडचिरोली. |
| आरोपी | **उमाकांत विठ्ठल शिवनकर,**<br>वय : ४२ वर्षे, व्यवसाय : मजुरी,<br>राह. नवेगांव, गडचिरोली,<br>ता., जि. गडचिरोली. |
| आरोपीतर्फे विद्वान विधिज्ञ | श्री पी.पी.भोयर |

**भाग ब**

| | |
|---|---|
| गुन्हयाची तारीख | ११.०१.२०२१ |
| प्रथम खबरी अहवालाची तारीख | ११.०१.२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | ०३.०६.२०२१ |
| दोषारोप निश्चित केल्याची तारीख | ०२.०३.२०२३ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | ०२.०८.२०२३ |
| न्यायनिर्णय राखुन ठेवल्याची | २४.०३.२०२६ |
| न्यायनिर्णयाची तारीख | २४.०३.२०२६ |
| शिक्षेच्या आदेशाची तारीख, जर असेल तर | निरंक |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटकेची तारीख | जामीनावर सुटल्याची तारीख | गुन्हा दाखल केलेसह | निर्दोष सुटला की नाही किंवा दोषी | शिक्षा ठोठावली | फौजदारी व्यवहार संहितेचे कलम ४२८ अन्वये खटल्यामध्ये न्यायालयाच्या कक्षेदरम्यान तुरुगांत राहल्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | उमाकांत विठ्ठल शिवनकर | आरोपीला अटक करण्यात आली नाही आरोपीस सुचनापत्रावर सोडण्यात आले | १२.१०.२०२२ | ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम | निर्दोष | निरंक | थ्नरंक |

## भाग - क

**अ. अभियोग पक्ष**

| अनु.क्र. | नाव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| सरकारी पक्षाचे सा.क्र.१ | सचिन विठ्ठल खोब्रागडे | घटनास्थळ जप्ती पंच साक्षीदार |
| सरकारी पक्षाचे सा.क्र.२ | शुक्राचारी किसनराव गवई | फिर्यादी/पोलीस साक्षीदार |
| स्रकारी पक्षाचे सा.क्र.३ | गजानन धनीराम सहारे | तपासी अधिकारी |
| सरकारी पक्षाचे सा.क्र.४ | अरविंद देवराव सिडाम | नमुना वाहक/पोलीस साक्षीदार |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार, जर असेल:**

| क्रमांक | नांव | पुराव्याचे स्वरुप<br>(प्रत्यक्ष साक्षीदार, पोलीस साक्षीदार, तज्ञ साक्षीदार, वैद्यकीय साक्षीदार, पंच साक्षीदार, इतर साक्षीदार) |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन साक्षीदार, जर असेल:**

न्या.प्र.श्रेणी.
(न्या.क्र.१)
गडचिरोली

| अ.क्रं. | नांव | पुराव्याचे स्वरुप |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**<u>सरकारी पक्ष/बचाव पक्ष/ न्यायालयीन निशानीची यादी</u>**

**ब. सरकारी पक्ष**

| **अ.क्र.** | **निशानी क्रमांक** | **विवरण** |
|---|---|---|
| १. | नि.क्र.१३- सा.क्र.१ | घटनास्थळ पंचनामा |
| २. | नि.क्र.१४ - सा.क्र.१ | मालमत्ताशोध जप्तीचा नमुना |
| ३. | नि.क्र.१७ - सा.क्र.२ | फिर्याद |
| ४. | नि.क्र.१८ - सा.क्र.२ | छापील पहिली खबर |
| ५. | नि.क्र.१९- सा.क्र.२ | सि.ए.फार्म |
| ५. | नि.क्र.२४- सा.क्र.३ | मुददेमाल रजिस्टर उतारा |
| ५. | नि.क्र.२५- सा.क्र.३ | सि.ए.अहवाल |
| ६. | नि.क्र.२६ - सा.क्र.३ | बाहेरगाव डयुटीपास |
| ७. | नि.क्र.२७ - सा.क्र.३ | वापसी रिपोर्ट |

**ब. बचाव पक्ष**

| अ.क्रं | निशानी क्रं. | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**क. न्यायालयीन निशानी**

| अ.क्रं | निशानी क्रं. | विवरण |
|---|---|---|
| १. | ०३ | रासायनिक विश्लेषण अहवाल |

**ड. भौतिक वस्तू**

| अ.क्रं | वस्तूचे क्रं | विवरण |
|---|---|---|
| निरंक | निरंक | निरंक |

**<u>न्या य नि र्ण य</u>**

(दिनांक २४.०३.२०२६ रोजी पारीत)

१. आरोपी विरुध्द महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाचे कलम ६५(ई) अन्वये खटला चालविण्यात आला. अभियोग पक्षातर्फे सरकारी अभियोक्तो यांचा तर आरोपीतर्फे त्याचे विद्वान

विधीज्ञ यांचा युक्तीवाद ऐकला. खालील मुद्दे माझे विचारार्थ निर्माण झाले व त्यासंबंधी निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे.

| मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|
| १. अभियोग पक्षाने असे सिध्द केले काय की, दिनांक ११.०१. २०२१ रोजी १९.१० ते १९.४५ वाजताच्या दरम्यान मौजा नवेगांव, ता.जि. गडचिरोली येथे आरोपीच्या ताब्यात देशी दारू सुपर सॉनिक रॉकेट संत्रा कंपनीच्या प्रत्येकी ९० मिली मापाच्या ५० निपा अवैधरित्या विनापास परवाना बाळगुन विक्रीकामी मिळुन आला ? | **...नाही.** |
| २. आदेश काय ? | **...अंतिम आदेशानुसार** |

## का र ण मि मां सा

२. सदर प्रकरणात अभियोजन पक्षातर्फे आरोपीविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी एकुण चार साक्षीदार तपासण्यात आले. त्यानंतर नि.क्र.१ वरील आदेशानुसार अभियोग पक्षाचा पुरावा बंद केला. आरोपीचे कलम ३१३(१)(ब) फौ.प्र.सं. नुसारचे बयान नोंदविण्यात आले. त्यात तिने सर्व साक्षीदारांचे बयान नाकारुन त्यांचे विरुध्द खोटे प्रकरण दाखल केल्याचे कथन केले. आरोपीने स्वत:तर्फे बचावाचे साक्षदार तपासले नाही.

### मुद्दा क्र.१ करीता :-

३. घटनास्थळ पंच सचिन विठठल खोब्रागडे (अ.सा.क्रं.१) ते आरोपीला ओळखतात. ते दि.११.०१.२०२१ रोजी ते पोलीसांनी पंचनाम्याकरिता कॉम्पलेक्स चौकात पंच म्हणुन बोलाविले आणि त्यांना कारण सांगीतले की, आरोपी उमाकांत शिवनकर याच्या घरी नवेगांव येथे दारू पकडण्याच्या संदर्भात जायचे आहे. त्यानंतरते पोलीसांसोबत मौजा नवेगांव येथे आरोपीच्या घरासमोर गेले. त्याच्यासोबत दुसरा पंच गौतम होता. त्याच्या घरासमोर जावून अवाज दिला असता आरोपी घराबाहेर आला त्याचे नाव उमाकांत शिवनकर असे सांगीतले. त्यांनी परिचय दिला. त्यानंतर घराची शोधाशोध केली असता त्याच्या घराच्या स्वयंपाक खोलीत गॅसच्या हंडयाजवळ एका थैलीमध्ये प्रत्येकी ९० एम एल मापाच्या ५० निपा रॉकेट संत्रा कंपनीच्या मिळून आल्या. जप्त मुददेमालावतुन एक शिशी रा.वि.करिता प्रयोगशाळेत पाठविण्याकरिता सिल करून त्यावर पंचाच्या व त्याच्या सहया घेतल्या, त्यानंतर तेथे सविस्तर घटनास्थळ जप्तीपंचनामा नि.क्र.१३ व मालमत्ताशोध जप्तीचा नमुना नि.क्र.१४ तयार केला.

४. त्याच्या उलटतपासात ज्या शासकीय गाडीने ते घटनास्थळावर गेले त्याचा क्रमांक त्यांनी सांगीतला नाही. परंतु त्या गाडीचा रंग पांढरा होता असे त्यांनी मान्य केले. सुमारे ०६.४५ वाजता सांयकाळी ते कॉम्पलेक्स चौकातुन निघाले आणि ०७.०० वाजताच्या आधी आरोपीच्या घरी पोहोचले होते. आरोपीचे घर हे जुनाट असून त्याच्या घराला दोन खोल्या असल्याचे दिसून येते. परंतु सदरहु साक्षीदारांनी आरोपीच्या स्वयंपाक खोली कोणत्या दिशेने आहे हे सांगण्यास तो असमर्थ ठरला. त्याचप्रमाणे दुसरा पंच कोण होत हे सांगु शकले नाही.

५. फिर्यादी शुक्राचारी गवई (अ.भि.सा.क्र.२) हे फिर्यादी असून दि.११.०१.२०२१ रोजी त्यांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार आरोपीच्या घरी मौजा नवेगाव येथे गेले त्यांनी सोबत सिलचे साहित्य आणि लॅपटॉप नेले होते. त्याच्या घरी जावून आवाज दिला असता एक इसम बाहेर आला आणि त्यांनी त्याचे नाव उमाकांत शिवनकर असे सांगीतले. त्याच्या घराची झडती घेतली असता त्याच्या स्वयंपाक खोलीतुन प्रतयेकी ९० मिली मापाच्या ५० देशी दारू रॉकेट संत्रा कंपनीच्या निपा मिळून आल्या. त्यांनी ते जप्त करून त्यातील एक नमुना रा.वि. करिता वेगळा काढला आणि त्यांनी फिर्याद नि.क्रं.१७ आणि छापील पहिली खबर नि.क्रं.१८ व सि.ऐ.फार्म नि.क्रं.१९ यातील मजकूर मान्य केला. त्याने आरोपीवर गुन्हा नोंद केल्याचे मान्य केले. त्याच्या उलटतपासात तो सांगतो की, ते आरोपीच्या घरी गेले व जप्तीपत्रक तयार केल्याचे नाकारले. त्यांनी आरोपीच्या घराची चर्तुसिमा त्यांच्या उलटतपासादरम्यान सांगीतली. त्यानुसार उत्तरेला कोटगले यांचे घर असल्याचे सांगीतले जेव्हा की, नि.क्र.१३ चे अवलोकन केले असता उत्तर दिशेला कोटांगले यांचे घर असल्याचे दिसून येते. यावरून सदर साक्षीदार यांनी घटनास्थळ जप्ती पंचनाम्याच्या अनुषंगाने चतुसिमा तंतोतंत सांगीतल्या नाहीत. आरोपीतर्फे देण्यात आलेल्या इतर सुझाव त्यांनी नाकारला.

६. तपासी अधिकारी गजानन धनीराम सहारे (अ.सा.क्रं.३) हे या प्रकरणामध्ये तपासी अधिकारी असून प्रत्यक्षदर्शी साक्षदार आहे हे दिसून येते. त्यांनी प्रकरणात मिळाल्यानुसार तपास पुर्ण केला. त्यांना तपासादरम्यान फिर्याद, प्रथम खबर अहवाल, सि.ए. फार्म प्राप्त झाले होते. त्यांनी साक्षीदारांचे बयाण नोंदविले होते. त्यांच्या उलटतपासादरम्यान आरोपीच्या घराच्या शेजारी राहणा-या इतर लोकांचे त्यांनी बयाण नोंदविले नसल्याचे त्यांनी मान्य केले.

७. नमुना वाहक अरविंद सिडाम (अ.भि.सा.क्र.४) याने याच्या कथनामध्ये त्यांची नमुना रासायनिक प्रयोगशाळा नमुने नेण्याकरिता डयुटी लागली. ते दि.१९.०१.२०२१ रोजी

पोलीस स्टेशनमध्ये हजर असतांना त्यांची पुढील दिवशी म्हणजेच दि.२०.१.२०२१ रोजी मुददेमाल रा.वि.नमुने नेण्याकरिता डयुटी लागली होती. त्यानुसार त्यांनी २१ नमुने आणि पत्र या गुन्हयातील एक नमुन्यासह रा.प्रयोगशाळेत नेले होते. परत आल्यानंतर त्यांनी पोलीस स्टेशनला डयुटीपास, वापसी रिपोर्ट आणि पोच पावती सुपूर्द केली. त्यांच्या उलटतपासादरम्यान नि.क्र.२४ म्हणजेच डयुटीपास वर इष्ट स्थानावर निघाल्याची वेळ आणि तारीख नमुद नाही असे दिसून येते. त्यामुळे रा.प्रयोगशाळेतुन परत येण्याकरिता किती वाजता निघाले हे स्पष्ट होत नाही. जेव्हा नि.क्र.२४ बाहेर गाव डयुटीपासवर त्यांची पोहोचल्याची वेळ सकाळी ०८.३१ अशी लिहीली होती. परंतु सदरहु साक्षीदार जर दि.२०.०१.२०२१ ला सकाळी नागपुर करिता निघाला असेल तर त्यांना तेथे पोहोचण्यास जवळपास चार तासाचा कालावधी लागणे अपेक्षीत आहे. त्यानुसार नि.क्र.२४ मध्ये नमुद असलेली वेळ ही चुकीची असल्याचे दिसून येते. सदर प्रकरणात जप्तीची तारीख ही दि.११.०१.२०२१ अशी असून नमुना वाहन यांनी दि.२०.०१.२०२१ म्हणजेच सुमारे ९ दिवसाने नमुना रासायनिक प्रयोगशाळेत नेल्याचे दिसून येते. जेव्हा की जप्त दारूचा नमुना हा नियमानुसार सात दिवसाच्या आत रा.प्रयोगशाळेत नेणे आवश्यक असते.

८. वर उल्लेखित साक्षदारांच्या साक्ष क्र.१ हा सचिन खोब्रागडे यांनी ज्या वाहनाने घ टनास्थळावर गेले त्याबददलचे विस्तृत वर्णन तसेच इतर दुसरा पंचाबददल माहिती सांगण्यास असमर्थ ठरले. त्यामुळे सदरचा पंच हा घटनास्थळावर गेला होता आणि त्याच्या समक्ष कार्यवाही झाली ही बाब स्पष्ट होत नाही. कारण तो पंच साक्षीदार असल्याने त्याने संपुर्णपणे कार्यवाहीची विस्तृत कथन करणे अपेक्षीत आहे. फिर्यादी म्हणजेच सा.क्र.२ यांनी जप्तीचे ठिकाण हे आरोपीच्याच मालकीचे होते याबाबत कुठलेही दस्त अभिलेखावर सिध्द केले नाही किंवा दाखल केले नाही. यावरून जप्तीच्या ठिकाणाची मालकी ही आरोपीची होती हे सिध्द होत नाही. त्यामुळे आरोपी हा प्रस्तुत घटनेच्या दिवशी त्याच्या ताब्यात अवैद्य दारू बाळगुन होता ही बाब सुध्दा सिध्द होत नाही. तपासी अधिकारी यांनी आरोपीच्या घरा शेजारी इतर स्वंतत्र साक्षीदारांचे बयाण नोंदविले नव्हते. सर्व बयाण हे पोलीस कर्मी यांचेच नोंदविल्याचे दिसून येते. नमुना वाहन सा.क्र.४ हे ब-याच दिवसानंतर म्हणजेच ९ दिवसाच्या कालावधीनंतर रासायनिक प्रयोगशाळेत नमुना घेवून गेलेले होते. त्यामुळे सदर मधल्या कालावधीत त्या नमुन्यासह कुठलीही छेडछाड न होता तो योग्य रितीने रासायनिक प्रयोगशाळेत नेला होता हे सुध्दा स्पष्ट होत नाही. अशा परिस्थीती त्यामुळे रा.वि. अहवाल नि.क्र.०३ सिध्द झाला असे म्हणता येणार नाही. यावरून अभियोग पक्षाच्या साक्षीदाराच्या बयाणामध्ये वांरवार आलेल्या विसंगती मुळे अभियोग पक्ष

आरोपीविरूध्द गुन्हा साबीत करण्यास अपयशी ठरला. त्यामुळे मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुददा क्रं.२ करिता :-</u>**

९. वर उल्लेखलेल्या प्रमाणे आरोपीविरुध्द अभियोग पक्षाने संशयाच्या पलीकडे जावून गुन्हा सिध्द केला नाही. जप्त मुद्देमाल देशी दारू अपील कालावधीनंतर विल्हेवाटीकरिता राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे पाठविण्यात यावे असे आदेशित करणे उचित ठरते. म्हणुन मी मुददा क्रं.२ च्या उत्तरार्थ खालील प्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी **उमाकांत विठठल शिवनकर** यांना महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम, १९४९ कलम-६५(ई) प्रमाणे शिक्षेस पात्र असणाऱ्या गुन्हयाकरीता फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम-२५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम-४३७(अ) प्रमाणे जामीनाची पुर्तता करावी.

३. प्रकरणात जप्त मुद्देमाल देशी दारू अपील कालावधीनंतर विल्हेवाटीकरिता राज्य उत्पादन शुल्क यांच्याकडे पाठविण्यात यावी.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला)

VASANTI RAGHUNATH MALODE
Digitally signed by VASANTI RAGHUNATH MALODE
Date: 2026.03.24 17:33:06 +0530

स्थळ : गडचिरोली.
दिनांक : २४/०३/२०२६.

(व्ही.आर.मालोदे)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
(न्यायालय क्र.१), गडचिरोली.